जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्र. ३२-२२ | दिनांक ०२/०२/२०२२

# खुन करुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मुंबई अहमदाबाद महामार्गाच्या बाजुला जंगलामध्ये मृतदेह फेकणा-या आरोपीत यास गुन्हे शाखा कक्ष -3 कडुन अटक.

दिनांक ०६/०१/२०२२ रोजी दुपारी १४.३० वा ते २१.०० वाजेच्या दरम्यान मुंबई अहमदाबाद महामार्गावर सकवार गावाचे हद्दीत श्री. जी. पेट्रोल पंपाचे पुढे ४०० मीटर अंतरावर अहमदाबाद बाजुकडे जाणारे रोडचे बाजुला मयत दिपक फिरतु भारव्दाज यास आरोपीत नामे - हरिशंकर ऊर्फ गौरी व त्याचे मित्राने मागील भांडणाचा राग मनात ठेवून दिनांक ०६/०१/२०२२ रोजी मयत दिपक यास विरार येथून बोईसर येथे परत येत असतांना त्याला जिवे ठार मारुन पुरावा नष्ट करण्याच्या हेतुने रस्त्याचे कडेला टाकुन पळुन गेले म्हणुन विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ३६ /२०२२ भा.द.वी.सं. कलम ३०२, २०१, ३४ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाची गांभिर्याने दखल घेवुन गुन्हयातील आरोपीत यांचा शोध घेणे बाबत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष- ३ चे अधिकारी व अंमलदार यांनी सदर गुन्हयाच्या समांतर तपासादरम्यान गुन्हयातील आरोपीत याचे बाबत गोपनिय बातमीदार यांचेकडुन माहिती मिळवुन व तांत्रीक विश्लेषणा व्दारे आरोपीत नामे - हरिशंकर ऊर्फ गौरीशंकर रामशरण निषाद वय ३० वर्षे, रा. यादव नगर, रघुविर स्कुलच्या समोर, बोईसर पुर्व., ता. डहाणु, जि. पालघर. मुळग्राम- तुलसिपुर, थाना- धाता, जि. फतेहपुर, राज्य उत्तर प्रदेश यास सतत २० दिवस परिश्रम घेवुन जि. फत्तेपुर, राज्य उत्तर प्रदेश येथे विविध भागात शोध घेऊन त्यास ताब्यात घेऊन दिनाक ०१/०२/२०२२ रोजी विरार पोलीस ठाणे येथे हजर केले आहे. आरोपीत हरिशंकर ऊर्फ गौरीशंकर रामशरण निषाद याचेकडे गुन्हे अनुषंगाने तपास करता त्याने सदर गुन्हा अधिक एक आरोपीत याचे मदतीने मयत दिपक भारव्दाज याचे सोबत व्यापारामधुन निर्माण झालेल्या वादातुन खुन केल्याचे निष्पन्न झाले आहे.

वरील कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पो.उप.निरी/ उमेश भागवत, शिवाजी खाडे, पो.हवा/ अशोक पाटील, पो.ना/ मनोज सकपाळ, मनोज चव्हण, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारवकर, पो.शि/ राकेश पवार, अश्विन पाटील, सर्व नेम- गुन्हे शाखा कक्ष -३ यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.